# माझी अमेरिका वारी.....

अभय जोशी आणि मी इंजिनीअरींगच्या काळातले क्लासमेट,पुढे तो(हुशार असल्यामुळे) अमेरिकेत गेला....एम.एस. करता झाला व तिथेच १३-१४ वर्षे राहिला,स्वत:चा उत्तम व्यवसाय सुरू करून वृध्दिंगत केला...सुखी झाला इत्यादी.अर्थात यात हल्ली विशेष वाटण्यासारखे काहीच नाही कारण हल्ली सारीच ‘खरी हुशार मुले’असे करताना दिसतात.

विशेष सांगण्यासारखे अभयच्या बाबतीत असे की इतकी वर्षे आमचा जो ‘लाइव्ह कॉन्टक्ट’ राहीला त्याचे संपुर्ण श्रेय त्यालाच जाते कारण त्यानेच अमेरीकेतील त्याच्या संपुर्ण वास्तव्यात,सातत्याने संपर्क ठेवला,वाढवला,(अन्यथा मी कुठला अमेरीकेला फोन करतोय) त्याची जेंव्हा केंव्हा भारतयात्रा या कालावधीत झाली त्या प्रत्येकवेळी त्याची माझी हमखास भेट होत असे.या भेटी दरम्यान त्याची माझी विविध विषयांवर चर्चा, विचार, क्वचित वादविवादही होत असे. परंतु या पेक्षा ही एक आणखी मला विशेष भावलेली बाब त्याच्याबद्दल उल्लेखनिय वाटते ती म्हणजे की इतक्या वर्षात पार ‘अमेरीकन मुरले लोणचे’झालेल्या अभयला परतुन भारतात यावेसे वाटले आणि ते प्रत्यक्षात आणण्याचे धाडस त्याने करून दाखवले.

तर अश्या या माझ्या मित्राला माझे एकुणच काय काय उद्योग चालू असतात व आहेत हे निटच माहीत होते.आणि त्याचमुळे अमेरीकेत सिएटल ग्रामी अवंदा ‘बृहन महाराष्ट्रमंडळाचे’अधिवेशन सिध्दीस जात असून या समयी तू तुझे वर्तमान उर्जा क्षेत्रातील कार्य सकळ अमेरीकावासी मराठी बांधवांसमोर प्रस्तुत कर अशी प्रेमळ आज्ञा त्याने मला केली.

सर्व सोपस्कार त्याच्याच मदतीने पुर्ण करुन २० जून रोजी मी अमेरीकेत प्रस्तुत झालो.भारता बाहेर पाउल टाकण्याची ही माझी पहिलीच वेळ,त्यामुळे पहिलाच विदेश प्रवास आणि तोसुध्दा अमेरीकेचा याचे बरेचसे कुतूहल कम दडपण मनावर वागवत पोहोचलो एकदाचा.

मला वाटते आजच्या घडीला सर्वात ज्यास्त चर्चा ज्या कोणत्या देशाबद्दल उठता बसता,विविध कारणांनी होत असते नव्हे बऱ्याचदा अपरिहार्यपणे करावीच लागते तो देश म्हणजे ‘अमेरीका’.हल्ली आपण शहरवासी मंडळी तर भारताबाबत बोलत नसू इतके हल्ली ‘यु.एस’.बद्दल बोलत असतो.या बोलण्यात बहुतेक वेळा हेटाळणीचा,असुयेचा,थोडाफार द्वेषाचा थोडक्यात सांगायचे म्हणजे ‘बोटे मोडण्याचाच’ भाव असतो, आणि खरच सांगतो माझाही या अमेरीका वारीपुर्वी थोडाफार तसाच होता.

म्हणजे मला वाटायचे की सर्वच अमेरीकाजन त्या ‘बुश बापलेकांसारखेच’ वागतात,बोलतात आणि म्हणूनच ते सर्व केवळ आपमतलबी,लबाड,आणि क्रुर सुध्दा असतात दुसरे असेही माझे ठाम मत होते की हे सर्वच जण केवळ ऐषोआरामात मग्न,उर्वरीत जगाबद्दल पुर्णत: बेफिकीर असे मस्तमौला वृत्तीचे लोक आहेत भरीसभर म्हणून त्यांना आपल्या सारख्या भव्य,उदात्त,मानवतावादी,समतावादी इतिहास किंवा ‘अध्यात्मिक टच्’ नसल्यामुळे एकप्रकारे फारच उथळ लोक इथे रहातात. त्याचमुळे इकडून तिकडे स्वकतृत्वावर जे जाउन स्थायिक होतात त्यांच्याबद्दल वाटायचे की काय ही सर्व मंडळी आपला आत्मसन्मान,देशप्रेम,समाजऋण वगैरे वगैरे गुंडाळुन ठेउन तिकडे राहातात.

तिकडे गेले की तिकडचेच होतात,त्यांना आपल्या देशाशी काहीच कसे देणेघेणे उरत नाही,इथल्या समस्या,इथले दारिद्रय,इथली बेरोजगारी,इथला शिक्षणाचा अभाव,आरोग्याचा विचका हे सगळेच कसे यांना झोंबत नाही? थोडक्यात तिकडे जाणारे 'सुटलो एकदाचे' याच भावनेने तृप्त कसे होउ शकतात,कोडगे होतात.

प्रत्यक्ष तिथे गेल्यावर मात्र लक्षात असे आले की हे जे सगळे आपल्याला वाटते तेअगदीच असत्य नाही परंतू पूर्ण सत्यही नाही तर वास्तवात ते एक अर्धसत्य आहे.आणखी एक साक्षात्कार झाला तो म्हणजे'बिझनेस' हा इथला परवलीचा शब्द आहे,त्याचमुळे व्यावहारीक चतुराई,वागण्या-बोलण्यातली फॉरमॅलीटी या सर्वच गोष्टी त्यांच्या नसानसात भिनलेल्या आहेत व तसाच त्यांचा दैनंदिन व्यवहार चालतो आपल्या खास 'घोळकर'स्वभावाला याचमुळे ते अगदीच 'कोरडे'भासतात.

वास्तविक पहाता आज अमेरीका ही सर्वच क्षेत्रात निर्वीवाद बलशाली आणि त्याचमुळे जगावर दादागिरी करु शकणारी व त्या अनुषंगाने थोडीफार मस्ती आलेली,आज घडीला तरी अनिर्बंध अशी सत्ता असल्याची जाणीव आपल्याला हरघडी होत असते.

परंतु याच बरोबर तिथल्या भेटीत माझ्या असेही लक्षात आले किंवा खरे तर प्रत्यक्ष जाणवले की इथला सामान्य माणूस आणि लाइम लाईट मधले त्यांचे सत्ताधिश यांच्या विचार विश्वात,वागणूकीत,मनोवृत्तीत महद अंतर आहे आणि ही बाब तर आपल्या इथल्या वास्तवाचेच प्रतिबींब आहे.सामान्य अमेरीकावासी आपल्या दैनंदीन जीवनात आपल्या इतकाच सहिष्णू,सरळमार्गी आणि समरसता,सदभावना,सामोपचार इत्यादींचा अवलंब करणारा 'कॉमन मॅन'आहे.

इतिहासाचे ओझे नसल्यामुळे आणि कोणीच 'मुळनिवासी'म्हणवून घेउ शकत नसल्यामुळे इथे येउ शकणारा,तिथल्या सिस्टीम मधे फिटट बसू शकणारा प्रत्येक जण इथे हवा आहे,नव्हे त्याचे स्वागतच आहे.

मला वाटते त्याचमुळे इथले सामान्यजन सहज जाता येता नजरानजर झाली की लगेच 'हाय', 'हॅलो'म्हणू शकतात.

पदोपदी जाणवते ती या लोकांच्या सहजव्यवहारात भरून राहीलेली शिस्त,आपलेपणा आणि मुलायम भाषा.म्हणजे सोप्या भाषेत सांगायचे तर असे म्हणू शकतो की आपल्या पुण्याबिण्यात आपण सगळेच रस्त्यातले सिग्नल तोडायला जसे सदासर्वदा 'टपलेले' असतो अगदी बरोब्बर तसेच फकस्त उलट हे सारेजण चक्क नियम पाळायला 'टपलेले' असतात.पोलीसाविनाच लेनची शिस्तच काय पाळतात आणि शांत डोक्याने ट्रफिक जामची भेंडोळीही लिलया सोडवतात.

इथल्याही 'जंतेला'आपापले जीवन जगण्याकरीता आपल्या प्रमाणेच स्विकृत,नियमीत काम करायला लागतेच परंतू गाडी पकडण्याची किंवा चालवण्याची जीवघेणी कसरत, सिग्नल तोडण्याची करामत ती सुध्दा स्वत:ला विनादुखापत करत नशिबाच्या जोरावर ऑफिस गाठण्याची कोणतीच 'एक्स्ट्रा करिक्युलर ॲक्टिव्हिटी' करायला लागत नाही.इथे सदासर्वदा वीज,पाणी आणि नित्योपयोगी सामान सामान्यजनांना विनासायास मिळू शकते.प्रवास,शिक्षण,आरोग्य सुविधा

योग्य मोबदल्यात उपलब्ध असतात आणि या सर्वापेक्षा महत्वाचे म्हणजे आपण जर आदर्श नागरीका प्रमाणे वागत असू तर सर्व समाजव्यवस्था,कायदा व त्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा सदासर्व काळ आणि ती सुध्दा शंभर टक्के आपल्याच बाजूने असणार आहे हा विश्वासच इथे पोचणाऱ्या प्रत्येक भारतीयाला सर्वाधिक मोहक वाटत असावा.मग वाटायला लागते ज्यांना इथे येउन स्थायिक होण्याचा 'चान्स' मिळालाय त्यांनी कोणत्या सबळ कारणास्तव तो सोडावा.

इथल्या संमेलनादरम्यान अनेक स्थायीक झालेल्या महाराष्ट्रीयनांशी वार्तालाप झाला,लक्षात आले की आपण समजतो तसे ते 'तिकडचेच' मुळीच झालेले नाहीयायत्.उलट त्यांनाही तिथल्या सर्व सोईसुविधांचा आस्वाद घेत असताना,माझ्या देशात या सर्वाची विविध कारणास्तव कमतरता आहे याची जाणीव टोचत असते.आणि यामुळेच सुचलेल्या,आणि उपलब्ध असलेल्या मार्गाने, यथाशक्ति,यथामती ही 'एनाराय्' मंडळी भारताच्या दुखण्यावर फुंकर घालण्याचा सदासर्वकाळ प्रयत्न करीत असतात.

एकुणात या सोळा दिवसांच्या वारीत माझ्या कामासंबंधी जेव्हा जेव्हा चर्चा झाली,त्यावेळी मुख्यत: तीन मुदयांच्या अनुषंगाने 'उर्जा स्वावलंबन' हा विषय मांडला.

एक- भारता समोर आज घडीला जे काही प्रश्न आहेत ते सर्वस्वी अव्दितीय आहेत आणि त्याचमुळे त्यांची उकलही अव्दितीयच असणार आहे व ती आपल्यालाच शोधावी लागणार आहे.

दोन- आज ज्याला आपण 'डेव्हलपमेंट' म्हणत आहोत आणि त्याचे जे काही निकष प्रचलित आहेत ते पुर्णत: पाश्चात्य आहेत. आपल्याला आपले देशी निकष शोधावे लागतील जेणेकरुन होणारी प्रगती सर्वव्यापी,सर्वस्पर्शी,दूरगामी आहे की नाही याचे सुयोग्य मुल्यमापन करता येईल.

आणि

तीन- आपल्या देशाला लाभलेल्या चार प्रमुख निसर्गदत्त देणग्या म्हणजे बहुप्रसवा जमिन,नियमीत येणारा पाउस,भरपूर सुर्यप्रकाश आणि सुबुध्द जनशक्ती या चारही 'प्लस पॉईंटचा' समावेश असलेली प्रगतीची नवी निती आपल्याला आत्मसात करावी लागेल.

या तिनही मुद्यांना स्पर्श करणारे असे बायोगॅसचे तंत्रज्ञान एका गावाकरिता प्रायोगिक तत्वावर उभे करण्याचा मानस मी सर्वासमोर मांडला व त्यांना तो भावला देखील.सर्वच समुदायाने या प्रयोगात सर्वार्थाने सामिल होण्याची इच्छा प्रगट केली.

मित्र अभयही या सर्व प्रवासात बरोबर होताच.या अनुभवातून पुढे काय काय करता येईल असा विचारविनीमयही आम्ही परतीच्या प्रदिर्घ प्रवासात केला.उपलब्ध अमेरीकास्थित भारतीय उर्जेचा योजनापुर्वक विनीयोग कसा करता येईल यावर सविस्तर विचार करित राहाण्याचा संकल्प करत परतलो.

भारतात परतल्यावर मात्र 'कुठून सुरवात करताय बोला' अशी स्थिती असल्यामुळे अजुन प्रत्यक्ष सुरवात जरी झाली नसली तरी विषय डोक्यात पक्का आहे हे निश्चित.

श्रीकांत पटवर्धन.....shreelink@yahoo.com